जाहिरात

बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) अहिल्यानगर - पुर्व
जामखेड नगरपालिका क्षेत्रातील अंगणवाडी मदतनीस मानधनी रिक्त पद भरती

या कार्यालय अंतर्गत येणाऱ्या जामखेड नगरपालिका क्षेत्रातील अंगणवाडी मदतनीस (एकुण 02) रिक्त पदे महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक-एबावि-2022 दिनांक 30 जानेवारी 2025 नुसार सरळ नियुक्तीने भरण्यासाठी पात्र स्थानिक रहिवासी असलेल्या महिला उमेदवारांकडुन दिनांक 30.07.2026 पासून ते दिनांक 12.08.2026 पर्यंत विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहे.

अंगणवाडी मदतनीस या मानधनी पदाच्या सरळ नियुक्तीसंदर्भात आवश्यक शैक्षणिक पात्रता, अटी व शर्ती या करीता **https://ahilyanagar.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर पद भरतीची सुचना व विहित अर्ज नमुना प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर वेबसाईट वरुन अंगणवाडी मदतनीस भरतीसाठीचा अर्जाचा नमुना डाऊनलोड करुन घेऊन अर्ज परिपुर्ण भरुन सर्व कागदपत्रांसह बंद लिफाफ्यात बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) अहिल्यानगर - पुर्व कार्यालय, नागुल बिल्डींग, पहिला मजला, डॉ.घोरपडे हॉस्पीटल जवळ, दिल्ली गेट, अहिल्यानगर 414001 या पत्यावर कार्यालयीन वेळेत समक्ष किंवा पोस्टाने विहीत मुदतीत सादर करावा. उशिरा प्राप्त अर्जाची नोंद घेतली जाणार नाही.

Child Development Project Officer
सत्यमेव जयते
A.Nagar(Urban)East

स्वा/-
(देवेंद्र राऊत
बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी)
अहिल्यानगर- पूर्व

जाहिरात

बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) अहिल्यानगर -पुर्व
जामखेड नगरपालिका क्षेत्रातील अंगणवाडी मदतनीस मानधनी रिक्त पद भरती

Child Development Project Officer
सत्यमेव जयते
A.Nagar(Urban)East

एकात्मिक बाल विकास सेवा योजना, बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) अहिल्यानगर पुर्व या कार्यालय अंतर्गत येणाऱ्या जामखेड नगरपालिका क्षेत्रातील अंगणवाडी मदतनीस (एकुण 02) रिक्त पदे महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक-एबावि-2022 /प्र.क्र.09/ का-6 दिनांक 30 जानेवारी 2025 नुसार सरळ नियुक्तीने भरण्यासाठी पात्र स्थानिक रहिवासी असलेल्या महिला उमेदवारांकडुन दिनांक 30.07.2026 पासून ते दिनांक 12.08.2026 पर्यंत विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहे. अंगणवाडी मदतनीस या रिक्त पदासाठी रक्कम रु. 7500/- प्रति महिना असे एकत्रित मानधनी तत्वावर निवडीसाठी सरळ नियुक्तीने (By Nomination) भरण्यासाठी जामखेड नगरपालिका या क्षेत्रातील शहरातील पात्र महिला उमेदवारांकडून खालील अटी व शर्तीनुसार विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

अटी व शर्ती :

1. **अर्ज** स्वहस्ताक्षरात भरलेला असावा. त्यात खाडाखोड नसावी. अर्ज सुवाच्य हस्ताक्षरात असावा. अर्जातील सर्व मुद्दयांची माहिती भरावी. लागु नसलेल्या ठिकाणी निरंक लिहावे. आवश्यक ठिकाणी स्वाक्षरी करण्यात यावी.
2. अंगणवाडी मदतनीस या पदांसाठी जाहिरातीत दिलेल्या नमुन्यात स्वतंत्र अर्ज करणे बंधनकारक आहे. विहीत नमुन्यातील अर्ज सादर करताना प्रकल्पातील ज्या नगरपालिका क्षेत्रातील रिक्तपदासाठी अर्ज केला आहे त्याचा स्पष्ट उल्लेख अर्जात करणे आवश्यक आहे.
3. एका उमेदवाराने एका पदासाठी एकच अर्ज सादर करावा. एकापेक्षा जास्त केंद्राच्या पदांसाठी वेगवेगळे अर्ज सादर केल्यास एकच अर्ज विचारात घेण्यात येईल. त्याबाबत उमेदवाराशी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.
4. अर्जासोबत जन्मतारखेचा पुरावा, शैक्षणिक पात्रतेबाबत गुणपत्रक व प्रमाणपत्र (दहावी, बारावी, पदव्युत्तर, डी.एड., बी.एड., MS-CIT इ.),जातीचे प्रमाणपत्र (स्वत:चे नावाचे), अनुभव प्रमाणपत्र, विधवा बाबत आवश्यक कागदपत्रे व दाखला, अनाथ महिला असल्यास (अटी व शर्तीमधील क्र.7 नुसार दाखला) इ. च्या सक्षम प्राधिकाऱ्याकडुन साक्षांकित केलेल्या प्रती जोडणे आवश्यक आहे. सदरचे सर्व आवश्यक कागदपत्र जोडले नसल्यास अगर साक्षांकित नसल्यास याबाबतचे गुण दिले जाणार नाहीत. सर्व कागदपत्रे अर्जतील नमूद क्रमानुसार जोडावी. अर्जासोबत जोडलेला प्रमाणपत्राची एकुण संख्या नमुद करणे आवश्यक आहे. मागविलेल्या कागद पत्राशिवाय इतर कागदपत्र तसेच मुळ कागदपत्रे जोडू नये.
5. अर्ज बंद लिफाफयात सादर करावा लिफाफयावर अंगणवाडी मदतनीस रिक्तपद भरती, शहराचे नाव,उमेदवाराचे नाव व पत्ता टाकावा. एका लिफाफयात एकच अर्ज सादर करावा. त्यासोबत विहीत केलेल्या अर्ज सोबत जोडलेला कागदपत्राची संख्या नमुद करावी कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडाव्यात. मुळ कागदपत्रे जोडू नये.
6. **अंतिम दिनांकानंतर कार्यालयात अर्ज स्विकारले जाणार नाही. अंतिम दिनांकानंतर आलेल्या किंवा डाकेने (पोष्टामुळे) विलंब झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.**
7. अर्जात शहराचे नाव व पदाचे नाव नमुद केलेले नसणे, अर्ज अपुर्ण भरलेला असणे, खाडाखोड असणे, उमेदवाराची विहीत ठिकाणी स्वाक्षरी नसणे तसेच अर्जाच्या सोबत सर्व आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या छायांकित व साक्षांकित प्रती नसणे इ. कारणांमुळे अर्ज अपात्र ठरविण्यात येतील व त्यासंबंधी स्वतंत्ररित्या उमेदवारांस कळविण्यात येणार नाही.

8. **शैक्षणिक पात्रता**: अंगणवाडी मदतनिस पदासाठी अर्जदार किमान 12वी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. इ. 12वीचे गुणपत्रकाची सत्यप्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील. उमेदवार एका प्रयत्नापेक्षा जास्त प्रयनात उत्तीर्ण झालेला असल्यास एकत्रीत गुण नमुद करावे. इयत्ता 12वी पेक्षा उच्चतम शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या उमेदवाराने अर्जात दर्शविलेल्या आवश्यक शैक्षणिक कागदपत्रांच्या छायांकित प्रती सांक्षाकित करुन अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. इयत्ता 12वी पुढील शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या उमेदवाराने अर्जात दर्शविलेले आवश्यक शैक्षणिक कागदपत्र साक्षांकित प्रत जोडलेले नसल्यास त्यासाठीचे गुण दिले जाणार नाही.
9. **वास्तव्याची अट**:- अंगणवाडी मदतनीस या पदासाठी फक्त स्थानिक रहिवासी महिला उमेदवार अर्ज करु शकतात. स्थानिक रहिवाशी म्हणजेच अर्जदाराने ज्या शहरातील अंगणवाडी मदतनीस पदासाठी अर्ज केलेला असेल त्याच शहरातील रहिवाशी असणे आवश्यक आहे. यासाठी रहिवाशी दाखला म्हणुन शासकिय दस्ताऐवज (जसे रेशनकार्ड/ मतदान कार्ड/ वीज देयक/ दूरध्वनी देयक/ घरपट्टी/ आधारकार्ड इ.) जोडणे आवश्यक आहे.
10. **वयाची अट**:-अंगणवाडी मदतनिस या पदासाठी वयोमर्यादा किमान 18 वर्षे व कमाल 35 वर्षे राहिल. तसेच विधवा उमेदवारासाठी कमाल वयोमर्यादा 40 वर्षे राहिल. त्याकरीता शाळा सोडल्याचा दाखला किंवा 10 वी उत्तीर्ण बोर्डाचे प्रमाणपत्र किंवा जन्मदाखल्याची सत्यप्रत जोडणे आवश्यक राहिल. उमेदवाराचे किमान व कमाल वय अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकास गणण्यात येईल.
11. **लहान कुटुंब**:- लहान कुटुंबाकरीताचा शासन निर्णय लागू राहील. वरील पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांस लहान कुटुंबाची अट लागु राहिल. उमेदवारांस दोन पेक्षा जास्त हयात अपत्ये (दत्तक दिलेल्या अपत्यांसह) नसावीत. अर्जासोबत दिलेल्या नमुन्यात लहान कुटुंबाबतचे प्रतिज्ञापत्र जोडणे आवश्यक राहिल. अन्यथा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.
12. **मराठी भाषेचे ज्ञान**:- अंगणवाडी मदतनिस रिक्त पदांसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांस मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. इ. 10 वी अथवा त्यापुढील शैक्षणिक अर्हतेपैकी किमान एक अर्हता मराठी भाषा विषयासह उत्तीर्ण असणे आवश्यक राहिल. अन्यथा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.
13. **उमेदवार विधवा असल्यास** :- सक्षम प्राधिकाऱ्याचे पतीचे मृत्यु प्रमाणपत्र सत्यप्रत जोडावे. तसेच विहित नमुन्यातील विधवा असलेबाबत स्वघोषणापत्र जोडावे.
14. **उमेदवार अनाथ असल्यास** :- संबंधित विभागीय उप-आयुक्त, महिला व बाल विकास विभाग यांचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र सत्यप्रत जोडावे.
15. **मागासवर्गीय उमेदवारांनी** सक्षम प्राधिकारी यांनी दिलेल्या विहित नमुन्यातील जातीच्या प्रमाणपत्र सत्यप्रत जोडावे.अनुसुचित जाती/अनुसुचित जमाती/इतर मागास प्रवर्ग/ विमुक्त जाती / भटक्या जमाती/ आर्थिक दृष्टया दुर्बल घटक / विशेष मागास प्रवर्ग / सामाजिक व शैक्षणीक दृष्टया मागास वर्ग- सक्षम प्राधिकारी यांनी दिलेल्या जातीच्या / प्रमाणपत्राच्या सत्यप्रतीसह अर्ज करावा. अन्यथा त्याबाबतचे गुण दिले जाणार नाही.
16. **अनुभव**:- उमेदवारास एकात्मिक बाल विकास सेवा योजनेची अंगणवाडी सेविका/मिनी अंगणवाडी सेविका/अंगणवाडी मदतनीस म्हणुन कामाचा किमान दोन वर्षाचा अनुभव असल्याशिवाय अनुभवासाठी असलेले गुण देण्यात येणार नाहीत.असा अनुभव उमेदवारांस असल्यास त्याबाबतचे सक्षम अधिकाऱ्याचे अनुभव प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. मान्यता प्राप्त खाजगी व स्वयंसेवी, अनुदानित संस्थेतील कामाचा अनुभव ग्राह्य धरला जाणार नाही.
17. **निवड कार्यपध्दती** :- महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.एबावि-2022/प्र.क्र.94/का-6, दिनांक 02.02.2023, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय

क्र.एबावि-2022/प्र.क्र.94/का-6,दिनांक 02.05.2023, दिनांक 11.08.2023, दिनांक 27.02.2024, महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक एबावि-2022/प्र.क्र.94/का-6/दि.30.01.2025 व तसेच मा.एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय महाराष्ट्र राज्य नवी मुंबई यांचे कडील पत्र क्रं. एबाविसेयो/अंगणवाडी /का-7/2024-25/517 नवी मुबंई दिनांक 31.01.2025 नुसार उमेदवारांनी अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रांवरुन इयत्ता 12 वी/ पदवी/ पदव्युत्तर/ पदविका/ डि.एड./बी.एड./ संगणक अर्हता उत्तीर्ण प्रमाणपत्र यामध्ये त्यांना मिळालेल्या गुणांनुसार तसेच विधवा, अनाथ, जात प्रवर्ग, अनुभव इ. साठी त्यांचे कागदपत्र व प्रमाणपत्रांवरुन मिळालेल्या एकुण गुणांनुसार गुणाक्रमांने पात्र उमेदवारांची शहरातील रिक्त पदांच्या संख्यानुसार निवड करण्यात येईल.

18. अर्जासोबत जोडलेल्या प्रमाणपत्रांनुसार शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे उमेदवारांना गुण देऊन प्राथमिक गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यात येईल. त्यावर अर्ज करणाऱ्या उमेदवारांना आक्षेप/तक्रार असल्यास अर्ज केलेल्या उमेदवारांनी 10 दिवसांचे आत लेखी तक्रार बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) अहिल्यानगर पुर्व कार्यालयाकडे सादर करावी. सदर तक्रारींची शहानिशा करुन अंतिम गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यात येईल.
19. गुणवत्ता यादी या कार्यालयाच्या तसेच संबंधित नगरपालिका यांच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात येईल. याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.
20. अंतिम निवड झालेल्या उमेदवारानांच निकालाबाबत कळविण्यात येईल. इतर उमेदवारांना कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.
21. संबंधित शहरातील अंतिम निवड यादी जाहिर झाल्यांनतर गुणानुक्रमे अंगणवाडी मदतनिस यांची निवड करण्यात येईल व गुणानुक्रमानुसार अंगणवाडी केंद्र देण्यात येईल. त्यामुळे निवड झालेल्या उमेदवारांना त्या-त्या शहरातील कोणत्याही अंगणवाडी केंद्रावर काम करावे लागेल.
22. उमेदवाराची एकदा नियुक्ती झाल्यावर कोणत्याही परिस्थितीत त्यांची इतर ठिकाणी बदली करता येणार नाही. तसेच त्यांचे निवासस्थानापासुन नियुक्ती देण्यात आलेल्या ठिकाणापर्यंत कोणताही प्रवासभत्ता अनुज्ञेय राहणार नाही.
23. हे तापुरत्या स्वरुपातील असुन योजना बंद झाल्यास किंवा सदर योजनेस मिळणारे अर्थसहाय बंद झाल्यास संबधितांना कोणतेही पुर्व सुचना न देता संबधितांची नेमणुक/ सेवा खंडीत/ समाप्त करण्यात येईल. पदाचे कामकाज न केल्यास, कामकाज असमाधान कारक असल्यास त्याचप्रमाणे नियुक्तीच्या ठिकाणी सतत गैरहजर राहिल्यास त्यांची नियुक्ती खंडीत करणेत येईल. याबाबतचे सर्व अधिकार बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी राखुन ठेवलेला आहे.
24. **प्रतिक्षा यादी**:- एकुण प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारावर उमेदवारांची प्रतिक्षा यादी ठेवण्यात येईल. काही कारणामुळे उमेदवार नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासुन 30 दिवसांत रुजु न झाल्यास किंवा त्यांस अपात्र ठरविण्यात आल्यास प्रतिक्षा यादीतील गुणानुक्रमानुसार पुढील उमेदवारांस नियुक्ती देण्यात येईल व सदर क्षेत्रात कोणत्याही कारणास्तव पद रिक्त झाल्यास अथवा नविन पद निर्मीती झाल्यास प्रतिक्षा यादीतील उमेदवारांस गुणागुक्रमे नियुक्ती देण्यात येईल. सदर प्रतिक्षा यादी निकाल जाहीर झाल्यापासुन एक वर्ष वैध राहिल.
25. **अपिल**:- मदतनीस या पदावरील घोषित निवडी संदर्भात कोणत्याही उमेदवाराची तक्रार असल्यास निवड यादी घोषित झाल्यापासुन 30 दिवसांच्या आत विभागीय उपआयुक्त, महिला व बाल विकास नाशिक विभाग, नाशिक यांचेकडे तक्रार करावी व मा. विभागीय उपआयुक्त, महिला व बाल विकास, नाशिक विभाग, नाशिक यांनी दिलेल्या निर्णयामुळे तक्रारदारचे समाधान झाले नसल्यास मा. आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांचेकडे पुढील 60 दिवसांत अपिल दाखल करता येईल.

26. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही टप्यावर उमेदवाराने अर्जात किंवा अर्जासोबत दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी नियुक्ती सदर प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर किंवा निवड झाल्यानंतरही रद्द करण्यात येईल. निवड झालेल्या उमेदवारांच्या नियुक्ती वेळी मुळ कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहिल. अन्यथा निवड प्रक्रियेतुन अपात्र ठरविण्यात येईल.

27. निवड झालेल्या उमदेवारांना नियुक्तीपूर्वी विहीत नमुन्यात सर्व अट व शर्ती मान्य असल्याचा करारनामा करुन देणे बंधनकारक राहिल.

28. एखाद्या उमदेवाराने त्याच्या निवडीसाठी प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल. अंगणवाडी मदतनिस यांना शासन दरानुसार रक्कम रु. 7500/- प्रति महिना असे एकत्रित दरमहा मानधन देय आहे.शासकिय नियमानुसार एकत्रित मानधनात वेळोवेळी करण्यात आलेली वाढ नियमानुसार अनुज्ञेय राहिल. मात्र मानधना व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते, सवलती अनुज्ञेय नाही.

29. अंगणवाडी मदतनिस हे एकत्रित मानधनावरील मानधनी स्वरुपाचे पद आहे. सदर पद बढती/ बदली/ वेतनवाढ इ. शासकिय सवलतीस पात्र नाही.

30. **सेवा समाप्तीसाठी वयाची अट**:- या शासन निर्णयान्वये नियुक्त होणाऱ्या अंगणवाडी मदतनिस यांची सेवा वयाची 60 वर्षे पुर्ण होईपर्यंत किंवा त्या शारीरिक दृष्ट्या काम करण्यास सक्षम नसल्यास यापैकी जे आधी घडेल तोपर्यंतच सुरु ठेवण्यात येईल.

31. जाहिरातीमधील कोणत्याही मुद्याबाबत साशंकता अगर संदिग्धता निर्माण झाल्यास भरती संबंधित शासन निर्णयातील तरतुदी, वरिष्ठ कार्यालयाचे आदेश तसेच या कार्यालयाचा निर्णय अंतिम राहील. तसेच प्रकल्पातील अंगणवाडी मदतनीस पदांच्या रिक्त पदामध्ये कमी जास्त करण्याचे अधिकार या कार्यालयाने स्व:ताकडे राखुन ठेवले आहे.

32. **पत्रव्यवहार**: भरती प्रक्रियेसंबंधी अर्जदारांस कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. सर्व सूचना जाहिरातीमधील अटी व शर्तीप्रमाणे असुन वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सुचना कार्यालयीन नोटीस बोर्डावर लावण्यात येतील.

33. **महत्वाची सुचना- या पदांकरीता लेखी परीक्षा अथवा मुलाखत घेतली जाणार नाही. सदर भरती प्रकिया शासन निर्णय दि.02.02.2023 व दि.30.01.2025अन्वये राबविण्यात येणार असून नियुक्ती गुणवत्ता यादीनुसार करण्यात येणार आहे. करिता उमेदावारांनी कोणत्याही भुलथापांना व अफवांना बळी पडू नये.**

- **अर्ज सादर करण्याचा पत्ता -**

बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) अहिल्यानगर- पुर्व, नागुल बिल्डिंग पहिला मजला, डॉ.घोरपडे हॉस्पीटल जवळ, दिल्ली गेट, अहिल्यानगर पिन कोड - 414001

- **अर्ज स्विकारण्याचा कालावधी** :- 30.07.2026 **पासुन** 12.08.2026 **पर्यंत**
- **अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक** 12.08.2026
- **अर्ज स्विकारण्याची वेळ - सकाळी**. 11:00 **ते सायं**. 06:00 **वाजेपर्यंत**

बाल विकास प्रकल्प अधिकारी
(नागरी) अहिल्यानगर- पूर्व

****

Child Development Project Officer

अंगणवाडी मदतनीस (मानधनी) पदासाठी अर्जाचा विहित नमुना

उमेदवाराचा अलिकडील काळातील काढलेला रंगीत फोटो चिकटवा व अर्जदाराने त्यावर स्वाक्षरी करावी.

प्रति,
मा.बाल विकास प्रकल्प अधिकारी
(नागरी)अहिल्यानगर- पूर्व.

विषय :- अंगणवडी मदतनीस पदासाठी ----------नगरपालिका क्षेत्रासाठी अर्ज
संदर्भ :- अंगणवाडी मदतनीस पदासाठी जाहिरात दिनांक ----------

मी कु./श्रीमती ----------खाली सही करणार ----------या शहरातील रहिवाशी असून मी बाल विकास प्रकल्प अधिकारी नागरी अहिल्यानगर पूर्व प्रकल्पातील----------या नगरपालिका / नगरपंचायत क्षेत्रातील रिक्त मदतनीस या पदासाठी अर्ज सादर करीत आहे. त्यासाठी माझी वैयक्तीक व शैक्षणिक माहिती खालीलप्रमाणे-

1. अर्जदाराचे नाव (/ विवाहपुर्वीचे नाव) ----------
2. विवाहानंतरचे नाव ----------
3. संपूर्ण पत्ता ----------
   ----
4. मोबाईल क्रमांक -
5. जन्मतारीख (जन्माचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला/दहावी बोर्डाचे प्रमाणपत्र इ.यापैकी कोणत्याही एका प्रमाणपत्राची सत्यप्रत जोडावी.)
6. अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकास असलेले वय ----------वर्षे----------महिने----------दिवस----------
7. राष्ट्रीयत्व ---------- जात ---------- प्रवर्ग ----------
8. मागासवर्गीय आहे काय ? होय /नाही ----------(असल्यास सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्राची सत्यप्रत जोडावी)

प्रवर्ग	अनुसुचित जाती	अनुसुचित जमाती	इतर मागास प्रवर्ग	विमुक्त जाती	भटक्या जमाती	आर्थिक दृष्टया दुर्बल घटक	विशेष मागास प्रवर्ग	सामाजिक व शैक्षणीक दृष्टया मागास वर्ग	खुला
होय/ नाही									

9. उमेदवार स्थानिक रहिवासी आहे काय ? होय /नाही ---------- (रहिवासी पुरावा जोडावा.)
11. विवाहित/अविवाहित ----------
10. हयात असलेल्या अपत्यांची संख्या मुले---------- मुली---------- एकुण अपत्ये----------
12. विधवा/आहे काय होय / नाही--------(अटी व शर्तीमध्ये नमुद शासकीय दस्तऐवज व विधवा असल्यास प्रमाणपत्र सत्यप्रत जोडावी.)
13. अनाथ आहे काय होय / नाही--------(अटी व शर्तीमध्ये नमुद शासकीय दस्तऐवज व अनाथ असल्यास प्रमाणपत्र सत्यप्रत जोडावी.)
13. मराठी भाषेचे ज्ञान आहे काय होय / नाही--------(अटी व शर्तीमध्ये नमुद इ.10 वी प्रमाणपत्र सत्यप्रत जोडावी.)
14. शैक्षणिक अर्हता - किमान 12 वी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे / एकापेक्षा जास्त प्रयत्नात उत्तीर्ण झाल्यास एकत्रित गुण दयावे.

शिक्षण	**उत्तीर्ण वर्ष**	**संस्थेचे/ शाळेचे /बोर्डाचे/ विद्यापीठाचे नाव**	**प्राप्त गुण**	**एकुण गुण**	**टक्के वारी**
1.इयत्ता बारावी					
2.पदवी					
3.पदव्युत्तर पदवी					
4.डि.एड					
5.बी. एड					
6.शासन मान्य संस्थेचे संगणक परीक्षा प्रमाणपत्र MS-CIT/ समकक्ष					
7.इतर					

15. शासकिय अंगणवाडी सेविका/अंगणवाडी मदतनिस /मिनीअंगणवाडी सेविका या पदाचा कमीत कमी 2 वर्षाचा अनुभव आहे का ? **होय / नाही** असल्यास अनुभव प्रमाणपत्र जोडावे

अंगणवाडी व प्रकल्पाचे नाव	पद	कालावधी (पासुन -पर्यंत)

अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे:- (सत्यप्रतीत जोडणे आवश्यक)	**होय**	**नाही**
1)अर्ज -विहीत नमुन्यातील व स्वहस्ताक्षरातील फोटो लावलेला व फोटोवर स्वाक्षरी केलेला असावा		
2)रहिवाशी पुरावा - 3)रेशनकार्ड/ मतदान कार्ड/ वीज देयक/ दूरध्वनी देयक/ घरपट्टी इ. पैकी कोणतेही एक)		
4) शैक्षणिक पात्रतेचे कागदपत्रे 1.इयत्ता 10 वीचे गुणपत्रक व प्रमाणपत्र		
2.इयत्ता 12 वीचे गुणपत्रक व प्रमाणपत्र		
3.पदवीचे गुणपत्रक व प्रमाणपत्र		
4.पदव्युत्तर पदवीचे गुणपत्रक व प्रमाणपत्र		
5.डिएड चे गुणपत्रक व प्रमाणपत्र		
6.बीएडचे गुणपत्रक व प्रमाणपत्र		
7.MS-CIT प्रमाणपत्र अथवा शासनाने वेळोवेळी समकक्ष ठरविलेला संगणक अभ्यासक्रम पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र असल्यास		
5)वयाचा पुरावा-		
i. 10 चे बोर्ड सर्टिफिकेट		
ii. जन्म दिनांक नमुद असलेलाशाळा/महाविदयालय सोडल्याचा दाखला		
iii. नगरपालिका/महानगरपालिका/ग्रामपंचायतीचा जन्म दाखला.		
6) **विधवा** असल्यास विवाह दाखला, पतीचा मृत्युप्रमाणपत्र,पुर्नविवाह न केल्याचे प्रतिज्ञापत्र		
7)**अनाथ असल्यास** :- संबंधित विभागीय उप-आयुक्त, महिला व बाल विकास विभाग यांचे प्रमाणपत्र सत्यप्रत जोडावे.		
8) **प्रवर्ग**- जात प्रमाणपत्र / जातीचा दाखला (लागु असल्यास)- प्रवर्ग,अनुसुचित जाती/ अनुसुचित जमाती / इतर मागास प्रवर्ग / विमुक्त जाती / भटक्या जमाती / आर्थिक दृष्टया दुर्बल घटक /विशेष मागास प्रवर्ग /सामाजिक व शैक्षणीक दृष्टया मागास वर्ग		
9)अंगणवाडी सेविका / अंगणवाडी मदतनीस/ मिनी अंगणवाडी सेविका म्हणून कमीत कमी 2 वर्षाचा अनुभव असणाऱ्या अनुभवाचा दाखला व नियुक्ती आदेश (असल्यास)		
10) लहान कुटुंब प्रतिज्ञापत्र		
अर्जासोबत जोडलेल्या प्रमाणपत्रांची **एकुण संख्या**		

वरिलपैकी ज्या कागदपत्राच्या स्वसाक्षाकिंत सत्यप्रती अर्जासोबत सादर केल्या आहेत त्या समोरील चौकटीत होय नमूद करावे तसेच अर्जासोबत जोडलेल्या प्रमाणपत्रांची एकुण संख्या लिहावी .

वरील प्रमाणे दिलेली माहिती, अर्जासोबत जोडलेली कागदपत्रे व प्रमाणपत्रे खरी असुन ती खोटी/चुकीची आढळल्यास माझा अर्ज बाद करण्यात येईल किंवा माझी निवड/ नियुक्ती झाल्यानंतरही माझी नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल व त्यास माझी काहीही हरकत नसेल. तसेच नियमानुसार कारवाईस मी पात्र ठरेल याची मला पुर्ण जाणीव आहे. तसेच जाहिराती मधील नमुद अटी व शर्ती मी पूर्णपणे वाचलेल्या असून त्या सर्व मला मान्य आहेत.

ठिकाण :- स्वाक्षरी ----------

दिनांक :- उमेदवाराचे नांव ----------

Child Development Project Officer
सत्यमेव जयते
A. Nagar (Urban) East

लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र

मी, श्रीमती. ----------श्री.----------

यांची मुलगी / पत्नी, वय---------- वर्षे राहणार----------

या द्वारे पुढीलप्रमाणे असे जाहिर करते की,

1. मी ----------या पदासाठी माझा अर्ज दाखलकेलेला आहे.

2. आज रोजी मला खालीलप्रमाणे अपत्य (मुले/मुली) आहेत. त्यापैकी दिनांक 28 मार्च 2005 नंतर जन्माला आलेल्या अपत्य (मुले/मुली) संख्या ----------आहे.

अ.क्र.	अपत्य (मुलाचे/मुलीचे) नांव	जन्मतारीख	वय
1.			
2.			
3.			
4.			

(3) हयात असलेल्या अपत्यांचीसंख्या दोनपेक्षा अधिकअसेल, किंवा भविष्यात दोनापेक्षा अधिक अपत्य झाल्यास, या पदासाठी मी अपात्र ठरविण्यास किंवा कामावरुन कमी करण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे.

ठिकाण:- उमेदवाराचे नांव ----------

दिनांक :- स्वाक्षरी ----------

****

स्वयंघोषणापत्र

मी खाली सही करणार ----------स्वयंघोषणापत्र सादर करीते की, मी ---------- नगरपालिका / नगरपंचायत या क्षेत्रातील ----------या ठिकाणची स्थानिक रहिवाशी आहे, सदरची खरी आहे. माहिती खोटी आढल्यास अंगणवाडी मदतनीस या पदासाठी झालेली निवडीस मी अपात्र राहील व नियमानुसार कारवाईस पात्र राहील.

ठिकाण:- उमेदवाराचे नांव ----------

दिनांक :- स्वाक्षरी ----------

****

विधवा असल्याबाबत स्वयंघोषणापत्र

मी ---------- श्री----------

यांची मुलगी वय ---------- वर्ष आधार कार्ड क्रमांक (असल्यास)----------

व्यवसाय ---------- राहणार ----------

या व्दारे घोषित करते की, मी राहणार ----------ता.---------- जि.--------

येथील रहिवासी असून माझे पती कै. ---------- हे मयत झालेले असून मी विधवा आहे. तसेच मी पूनर्विवाह केलेला नाही.

तसेच मी याव्दारे घोषित करते की, वरील सर्व माहिती माझ्या व्यक्तिगत माहिती व समजुतीनुसार खरी आहे. सदर माहिती खोटी आढळून आल्यास भारतीय दंड संहिता अन्वये आणि / किंवा संबंधित कायद्या नुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन. तसेच सदर स्वयंघोषणापत्रकाव्दारे मला मिळालेले सर्व लाभ सर्वकषरित्या काढून घेण्यास येतील याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण:- उमेदवाराचे नांव ----------

दिनांक :- स्वाक्षरी ----------

Child Development Project Officer A.Nagar(Urban)East सत्यमेव जयते

बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) अहिल्यानगर -पुर्व
जामखेड नगरपालिका क्षेत्रातील अंगणवाडी मदतनीस मानधनी रिक्त पद भरती
रिक्त अंगणवाडी मदतनीस रिक्त पद दर्शविणारा तक्ता

अ.क्र.	अंगणवाडी क्र.	अंगणवाडीचे नांव
1.	05	नुराणी कॉलनी - 1 जामखेड
2.	20	भूतवडा - जामखेड
एकुण रिक्त पदे संख्या		02

स्वा/-
(देवेंद्र राऊत
बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी)
अहिल्यानगर- पूर्व

****

बंद लिफाफयात पाकिटावर नाव व पत्ता लिहावयाचे नमुना खालील प्रमाणे

जामखेड नगरपालिका क्षेत्रातील अंगणवाडी (मदतनीस) मानधनी पदासाठी अर्ज

प्रति,
मा.बाल विकास प्रकल्प अधिकारी,
(नागरी) अहिल्यानगर पुर्व
पत्ता:-नागुल बिल्डिंग पहिला मजला,
डॉ.घोरपडे हॉस्पीटल जवळ, दिल्ली गेट,
अहिल्यानगर - पिन कोड 4140001

प्रेषक,
अर्जदाराचे नाव :----------
अर्जदारचे संपूर्ण पत्ता:- ----------
पिन कोड:-
दुरध्वनी क्रमांक----------